# प्रकरण सातवे

# ‘गबाळ’ व ‘उचल्या’ यातील वाङ्मयीन स्वरुप

# प्रकरण ७ वे

## 'गबाळ' आणि 'उचल्या' यातील वाङ्‌मयीन सौंदर्य.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, प्रगतीचे मापन करणारी व इतिहास दर्शविणारी दोन प्रभावी अस्त्रे आहेत. एक लेखणी आणि दुसरे वाणी. ही दोन्हीही अस्त्रे दलित लेखकांनी कमावली पाहिजेत. या दोनअस्त्राच्या जोरावरच प्रबोधनाला गती येईल. आणि दलित लेखकाच्या वेदना, विद्रोहाला सत्व लाभेल'[१] यामुळेच दलित लेखकानी लेखणी हातात घेऊन बहु आयामी असे लेखन केले. दलितांच्या जीवनावर लादल्या गेलेल्या सामाजिक व आर्थिक शोषणाचे, दु:खाचे अभंग गाथा नोंदविणे ही प्रमुख भूमिका या लेखनापाठीमागे आहे. ही घटना स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काय कमावले आणि काय गमावले याचा विचार करीत असताना दलित लेखक आपल्या व्यथा, वेदना सवर्णाच्या सुवर्णातील हिणकसपणा समाजासमोर मांडू लागले. आपल्या लाखो आया बहिणीचा आक्रोश आणि टाहोंना त्यांनी शब्दबध्द केले ही घटना आपण खूप काही कमावल्याचे सांगून जाते.

'गबाळ आणि उचल्या' या आत्मकथनातील वाङ्‌मयीन सौंदर्याचा विचार करीत असताना आपणास असे दिसते की, हे दोन्हीही लेखक भटक्या समाजाने लाचारी, दारिद्र्य, अज्ञान, उपासमार,गावकुसापासून दूरचे जिणे पत्करले अशा या समाजातील आहेत. पण हे लेखक आपल्या हृदयाशी निश्चित असे काहीतरी कवठाळून जीवन जगताना दिसतात. आणि तसेच ते लेखनही करतात. या पाठीमागे एक तळमळ आहे. आपल्या समाजाच्या माथी असणारा भटकेपणा थांबावा, त्याने दारोदार हिंडू नये, गुन्हेगार म्हणून जीवन जगू नये, त्यांनी शिकावे, संघटीत व्हावे, प्रसंगी न्याय आणि हक्काच्या स्थापनेसाठी संघर्ष करावा, आपल्या स्त्रियाकडे सुवर्णसमाजाचा असणारा 'उपभोग्यवादी' दृष्टीकोन बदलावा ही कळकळ यापाठीमागे आहे. हे दोन्ही लेखक शिक्षित आहेत ही या लेखनाच्या संदर्भातील महत्वाची घटना आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्रात जी नवनवीन परिवर्तने झाली ती परिवर्तने, राजकीय व सामाजिक जीवनातील उलथापालथ त्यांनी पाहिलेली आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनात एक समतोलपणा व समन्वयवादी दृष्टीकोन दिसून येतो. या लेखकाच्या अंत:करणातील या समाजाची होणारी ससेहोलपेट पाहून येणारी अस्वस्थता आणि या अस्वस्थतेतून समाज सुधारणेची त्यांच्याठिकाणी निर्माण झालेली तळमळ ठिकठिकाणी प्रत्ययास येते.

१) **सार्थ शीर्षके :** मराठी साहित्यात 'घराची कळा अंगण सांगते' अशी म्हण आहे. या म्हणीप्रमाणेच शीर्षकातूनच आपणाला पुस्तकाची जडणघडण, वाङ्मयीन मूल्य समजते. कारण शीर्षकातून कितीतरी माहिती, ज्ञान लेखकाच्या अंत:करणातील विचारधारा आपल्या लक्षात येते. या अर्थाने दोन्ही शीर्षके सार्थ आहेत. कारण आत्मकथनाच्या कलातत्मकतेची जाणीव प्रतिकात्मक व बोलकी शीर्षके वाचूनच वाचकाच्या मनात उभी राहते. कारण गबाळ मधून दादासाहेब मल्हारी मोरे या कुडमुडे जोशी समाजाच्या लेखकाने भणंग, लाचार जीवनाचे चित्रण करताना पाठीला पोट बांधून, आपला संसार घोड्यावर लादून गावोगाव हिंडणाऱ्या, हगणदारीत राहणाऱ्या, आयुष्यभर भटकंती करणाऱ्या या जीवन प्रणालीला गबाळ यातून शब्दबध्द केले आहे ते योग्य वाटते व गबाळ शीर्षकातूनच आपणाला या समाजातील व्यथावेदनेची जाणीव होते व या गबाळातच स्वयंपाकाचे साहित्य, भिक्षेची साधने, घोडा, कंदील, मांजरे आहेत. हे या गबाळातील गबाळ आहे.

उचल्या हे शीर्षकदेखील सार्थ आणि खूप काही सांगणारे आहेत. कारण उचल्या शब्दातून नेहमीच काहीतरी उचलत राहणाऱ्या पिढ्यान्‌पिढ्या भुरट्या चोऱ्या करणाऱ्यांचा हा व्यवसाय आहे. अशा समाजाचा, संस्कृतीचा बोध होतो. हा समाज पोटासाठी काही ना काही चोरून, खुडून आणत असतो. पर्यायाने पोलिस येतात,मारहाण होते, कोर्टकेस होते, शिक्षा भोगणे इ. घटनांचे चक्र सुरु होते व ही समाजाची जीवनपध्दतीच आहे. परंपरेनेच हा शिक्का समाजाच्या माथी मारलेला आहे. त्यामुळे या व्यवसायातून सुटका नाही, म्हणून हाच प्रमुखख व्यवसाय झालेला असतो. परिणामी अवहेलना, लाचारी तुरुंगातील खडी फेडणे इ. शिक्षेचा तपशील या लेखनात आला आहे. अशा प्रकारे आत्मकथनाच्या शीर्षकावरुनच खूप काही बोध वाचकाला होतो. म्हणून ही शीर्षके सार्थ आहेत.

२) **सामाजिक जाणिवांचा प्रत्यय.** सामाजिक जाणिव ही माणसाचे सांस्कृतिक मूल्य जोपासणारी जाणीव आहे. लेखक जेव्हा व्यक्तिगत जीवनानुभव घेत असतो तेव्हा या अनुभवांना सामाजिक जाणिवेची पार्श्वभूमी असते. लेखक आपल्या भावानुभावाचा शोध सामाजिक पातळीवर व सामाजिक जाणिवेच्या संदर्भात घेतो व त्याची साहित्यातून अभिव्यक्ती करतो. अशी ही सामाजिक जाणीव जीवनवाद व वास्तववाद यांच्याशी जवळचे नाते प्रस्थापित करते. म्हणून डॉ. यशवंत मनोहर लिहितात की, ''वाङ्मयीन कलाकृती भोवतीच्या सांस्कृतिक, आर्थिक, वाङ्मयीन, नैतिक आणि सामाजिक

संदर्भातूनच साकार होत असते. या सर्वांचा प्रत्यक्षाप्रत्यक्षा परिणाम वाङ्मय कृतीत मुखरित होत असतो. साहित्य हे समाजजीवनाचे महत्वाचे अंग असून इतर अंगाशी त्याचे अंगभूत नाते असतेच. साहित्याचे विश्व हे त्यामुळेच सांस्कृतिक विश्व ठरते. काही केलेतरी साहित्यकृतीला जीवनापासून तोडता येत नाही''[२] यशवंत यांनी मानवीमूल्यांसबंधी घेतलेली भूमिका म्हणजेच सामाजिक जाणीव होय.

अशाप्रकारे या आत्मकथनातून तीव्र सामाजिक जाणीव आढळून येते व तीच दलित जाणीव म्हणून ओळखली जाते. गबाळकार आपल्या समाजाच्या नशिबी असणारी भटकंती, त्याचे हगणदारीतील राहणे, त्याची दररोजची लाचारी, त्यांच्या समाजातील जात पंचायत, श्रध्दा अंधश्रध्दा, दैववाद, निसर्गाशी सामना देत दररोजचे भटकणे इ. बरोबरच आपल्या समाजाचा शिक्षणाकडे पाहण्याचा विकृत दृष्टीकोन यासाठी व्यथित होताना दिसतात. हे सर्व थांबले पाहिजे. असेच किती दिवस चालणार ? यासाठी व्यथित होताना दिसतात तर उचल्याकारही आपल्या समाजावर इंग्रजांनी मारलेला गुन्हेगारीचा शिक्का पुसला जावा. आपल्या समाजानी शिकले पाहिजे, स्वकर्तृत्वावर जगले पीहजे, संघटीत झाले पाहिजे, वेगवेगळ्या व्यवसायात स्थिरावले पाहिजे ही तळमळ व्यक्त करताना दिसतात. यापाठीमागे एक सामाजिक जाणीव भरलेली आहे. असेच आपणाला दिसते.

३) **भटक्या विमुक्तांचे जीवन.** दलित साहित्य हे दलित चळवळीचे एक साधन म्हणून निर्माण झाले असले तरी ते कलात्मकतेपासून दूर नाही. अन्य दलित साहित्याप्रमाणेच दलित आत्मकथनामागेही वेगवेगळ्या प्रेरणा आहेत. सामान्य माणूस हा या सर्वाचा केंद्रबिंदू आहे. शोषणापासून मुक्ती हा या तत्वज्ञानाचा गाभा आहे. मानवमुक्तीचा पुरस्कार, मानवत्वाची प्रतिष्ठा, मानावाचे स्वातंत्र्य, सामाजिक न्याच आणि समता मूल्याची प्रतिष्ठापना या लेखनाने महत्वाची मानली आहे. या आत्मलेखनामुळे मराठी साहित्यात एका अनोख्या युगानुयुगे आंधारात चाचपडत असणाऱ्या, वर्षानुवर्षे गावकुसात राहणाऱ्या कोरभर भाकरीच्या शिळ्या तुकड्यासाठी सवर्णाच्या दारात तासनूतास उभा राहणाऱ्या पाठीला पोट बांधून दारिद्याच्या व्यसनाच्या, अंधश्रध्दा व भयानक अशा रुढी परंपरेच्या विळख्यात जीवन जगणाऱ्या या समाजाची कहाणी अवतरली आहे ही घटनाच विलक्षण आहे. या लेखकाचा प्रयत्न कौतुकास्पद आहे. कारण यापूर्वीच्या मराठी साहित्यात प्रेम, गांधीवाद, औद्योगीकीकरण यामुळे बदलेली जीवनमूल्ये याचीच चित्रणे येत होती. म्हणून बलुतं, ऊपरा, अक्करमाशी या आत्मकथनाप्रमाणेच 'गबाळं' आणि 'उचल्या' यांच्या रुपाने एक वेगळी संस्कृति, वेगळा इतिहास

समाजासमोर आला.

गबाळ या आत्मकथनातून ज्याला स्वत:चे भविष्य समजत नाही तो इतरांच्या कर्मरेषा उजळवीत जीवन जगतो. पाठीला पोट बांधून दारोदार भविष्य वर्तवित गावोगाव हिंडायचे, मिळालेले धान्य, कोंबड्या आठवड्याच्या बाजारात नेऊन विकायचे संसाराचे साहित्य आणायचे. उरलेले पैसे जास्तीत जास्त दारु पिऊन घालवायचे, वर्षाला एका मुलाला जन्माला घालत घोड्यावर संसार लादून ऊन, पाऊस, वारा अंगावर घेत वर्षानुवर्ष अंधारात राहायचे आणि एके दिवशी मातीत मिसळून जायचे. हे या कुडमुडे जोशी समाजाचे जीवन कित्येकांना अज्ञात होते. ते यामुळेच ज्ञात झाले. गबाळप्रमाणेच उचल्या ही एक जमात आहे. इंग्रजाने मारलेला तो शिक्का आहे. त्यामुळे कुठेही गुन्हा घडला की पोलिस यांची धरपकड करतात त्यामुळे यांना कोणी काम देत नाहीत म्हणून सतत चोरी करावी लागते. गुन्हा दाखल होऊ नये म्हणून सावकाराकडून व्याजाने पैसे काढून पोलीसांना द्यावे लागतात. यात्रे - जत्रेत खिसे कापून हे कर्ज फेडायचे, भरपूर दारु प्यायची, दांडी-मांडी कलमानुसार दंड भरीत जातपंचायतीसमोर नाक घासायचे. कुत्रे, मांजरे यांनाच संपत्ती समजून त्यांनाच गोंजारायचे हे सर्व भयावह जिणे या पुस्तकामुळे समाजासमोर आले. आणि पुन्हा एकदा आपल्या संस्कृतीची मुल्ये तपासून घेण्याची गरज सवर्ण समाजाला झाली.

या दोन्ही आत्मकथनातील समाजाचे जीवन भटक्या जातीजमातीतील लोकांचे जीवन आहे. अर्थात प्रत्येकाचे जीवन जगण्याचे मार्ग वेगळे असले तरी जीवन जगत असताना येणारी दु:खे, संकटे, लाचारी, अपमान हे सर्व समान आहे. ही समानता या दृष्टीने महत्वाची आहे. आजपर्यंतच्या मराठी साहित्यातील आत्मकथने "महार" समाजातील मंडळींनीच लिहिलेली आहेत. पण "गबाळ" व "उचल्या" या लेखकाने या परंपरेला छेद देऊन एक नवे जीवन मराठी साहित्यात आणालेले आहे. त्यातून भटक्या विमुक्तांच्या व्यथा वेदना साकार झाल्या आहेत.

४) **दयनीय स्त्रीजीवन :-** दलिताना प्रस्थापित समाजरचनेने शुद्र लेखून त्यांच्यावर अत्याचार केले. परंतु स्त्रीला सुध्दा वेगळी वागणूक दिली नाही. दलित आत्मकथनातून येणारी स्त्री ही सतत राबणारी आपल्या मुलाबाळासाठी, फुटक्या तुटक्या संसारासाठी, नवऱ्यासाठी अहोरात्र कष्टणारी सोशिक मनाची स्त्री आहे. उद्याचा दिवस आपला असणार असे तिला मनोमन वाटते. ती आशावादी आहे. गबाळ मधील दादासाहेबाची आई अशीच वर्षातील अकरा महिने पोट पाठीवर बांधून ऊन,

पाऊस, वारा यांच्याशी तोंड देत ती हिंडते. दादासाहेबाच्या शिक्षणासाठी कर्ज काढायची वेळ येते तेंव्हा त्याचे वडील कर्ज काढून शाळा शिकण्यास नकार देतात. ''बोंबलत जाऊदे तुझी शाळा. ऱ्हा हतं मागून खाचील आमच्या डोळ्या म्होर''. या वडिलांच्या बोलण्यानंतर त्यांची आई मात्र म्हणते की, ''जातू म्हणतुया तर जाऊ द्या की, सारकं दिस असलेच येत्याती व्हय. त्याच्या शाळंच्या म्हागच येळ चांगली न्हाय''.[३] अशाप्रकारे ही स्त्री कष्टाळू, आशावादी आहे. लेखकाची मानका आजी देखील वैधव्याचे जीवन जगत स्टेशनरी माल विकून रोजगार हमीच्या कामावर जाऊन लेखकाला डबा देते. सोना आजीदेखील दादासाहेबाला परीक्षेला जाताना विठ्ठलाच्या पाया पडून जायला सांगते. तिच्याजवळ रहात असताना ती त्याला प्रोत्साहन देते. बिऱ्हाडाबरोबर विमल हिंडत असताना बाळांतीण होते वरुन पाऊस सुरु असतो पण ती कोठेही तक्रार करीत नाही. आपल्या बाळाला जपत ती दिवस काढते.

उचल्यामध्ये देखील आलेली लेखकाची आई जनावरे संभाळते. दूधदुभते विकून संसार चालवते. पोलिसांना जेव्हा जेव्हा पैसे द्यावे लागतात तेव्हा जवळ असणारे किडूक मिडूक विकून टाकते. आपला मृत्यू दिसत असतानासुध्दा ''माझ्या लेकराला नीट संभाळ गं, केसरबाई, काशीबाई माजा काय बी भरोसा न्हाय''.[४] अशी आपल्या लेकराचीच काळजी वाहते. लेखकाच्या घरात आलेली नवाडी भाभीही खूप कष्ट करते. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत ती जीवन जगते. लेखकाची पत्नी सौ. छबू देखील लेखकाबरोबर अत्यंत बिकट परिस्थितीत, दारिद्र्यात उपासमार सहन करीत दिवस काढते. लेखकाकडे याणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यांची काळजी वाहते. ठिकठिकाणच्या सभा संमेलनात, मोर्चात सहभागी होऊन भटक्या जातीजमातीतील स्त्रियांना मार्गदर्शन करते.

या आत्मकथनातून आलेल्या याा स्त्रिया अत्यंत कष्टाळू प्रामाणिक दारिद्यात उपवास करीत जीवन कंठीत असतानाही आशावादी आहेत. आपल्या कुटुंबासाठी त्या झिजताना दिसतात.

५) **भूकेचे चित्रण.** दलितांच्या जीवनात भूकेचा प्रश्न हा रौद्र स्वरुपात आहे. गरीबाला भूक नेहमीच जाळीत आली आहे. लाचार बनवत आली आहे. तसे त्यांचे अर्धे प्रश्न त्यांच्या भूकेतून निर्माण झाले आहेत. अस्पृश्यतेबरोबर त्यांना भेडसावणारा जो प्रश्न आहे तो भूकेचा आहे. या आत्मकथनातून भूक मोठ्याप्रमाणात अभिव्यक्त झाली आहे. या पोटाच्या खळगीने माणसाला पशूपेक्षा हीन जीवन जगावे लागते. प्रसंगी शिळ्या भाकरीचे तुकडे वेचून वेचून खावे लागतात. सवर्णाच्या पंक्तीकडे

पहात तासन्‌तास ताटकळत उभे रहावे लागते. तेव्हा कुत्र्यासारखी हाड हाड होते पण काहीच झाले नाही अस समजून पत्रावळ्या घासून पुसून घ्याव्या लागतात. मध्यरात्री केव्हातरी उकीरड्यावर बसून घासभर पोटात घालावे लागते. यासंबंधीची वेदना सांगताना बाज गावातील प्रसंगाचे लेखकाने वर्णन केले आहे. या गावात हे गबाळ असताना गावातील पाटलाचे मुलाचे लग्न चाललेले असते तेव्हा पोटाला आज दोन चार घास गोडधोड मिळेल म्हणून हा समाज तेथे जातो आशाळभूत नजरेने पहात उभे राहतो तेव्हा पाटील वैतागतात मग नागू अजोबा विनंती करतात तेव्हा पाटलानं थोडावेळ विचार करुन थोडीथोडी खीर वाढायला सांगितली "पोर मानसं गडबडीनं खात हुती. ते वाढपी एकदा वाढून गेले ते परत आले नाहीत आमची पंगत हात वाळवीत बसली होती. शेजारची कुत्री कमीत कमी खरकटं तरी पोटभर खात होती आणि आम्ही पोटाला थोडा नैवेद्य दाखवून हात वाळवित बसलो होतो. मारुती मामा म्हणीत होते "आवं झालं आमच्या ताटातलं या की" ते ऐकून पाटील गुरकावला "आता जाता का न्हाय... आयला जातच तुमची लय आशाखोर.... जावा उठा पळा" आमच्या लोकांनी बऱ्याच विनवण्या केल्या पण त्याचा काही उपयोग झाला नाही."[५] अशाप्रकारे पोटासाठी, भूकेसाठी स्वत: अनुभवलेल्या प्रसंगाचे वर्णन लेखकाने केले आहे. या पोटासाठीच हा समाज "जे चालतया, लक्ष्मी पावतीया यश येतया मावशी, भाकरीचा एखादा तुकडा द्या" अशी भीक मागीत दारोदार हिंडत असतो. या भूकेचे चित्रण गबाळातून पानोपानी दिसते. गबाळप्रमाणेच उचल्या या आत्मकथनातून देखील भूकेचे चित्रण आलेले आहे. या भूकेचे वर्णन करताना लेखक सांगतात "आखाड श्रावणात तर रोट्या मिळायच्याच नाहीत मग बाबाच्या मळ्यातून रताळ्याचा पाला ओरबडून आणायचा तो पाला शिजवायचा त्यातलं पाणी काढायचं. रताळ्याचा पाला वाटायचा त्याचे मुटके कोडबळे करायचे. किती दिवस त्याच्यावर जगायचं ज्या रानात रताळ होतं तितला पाला ओरबडून उन्हाळा झाला होता. हा पाला घेतल्यानं बाबाच्या मालकानं एकदा शिव्या देऊन आठ दिवस घरी बसवलं होतं."[६] यानंतर आणखीन एका अनुभवाचे वर्णन करताना ते सांगतात "कधी कधी तर मी लई उपाशी असलं की, आमोशा-पुनवेला आखाड श्रावणात कोनाला बरं वाटणा झालं की, लेकरावरुन निवद व नारळ उतरुन टाकायचे. ते मी हुडकीत मसनवाटेकडे पानंदीला जायचं. कधी कधी भूताला निवद, नारळ टाकलं की, कोण खात नव्हते कारण भूत लागतं म्हणायचं. बरं माझ्या पोटात आग पडायची तवा भूत बित काय वाटायचं नाही. नारळाला तीन ठोकर मारायचं अन्‌ खालचे खालचे निवद घ्यायचे वरच्या निवदाला तेल अन्‌ तव्याच काळं लावलेलं रहायचं. तीसुध्दा निवेद टाकून देवं अस वाटत नव्हतं. त्या निवदावर पापट काळं झाल्याल तेवढं टोकरुन काढायचं अन्‌ एखाद्या शेतात झाडाखाली बसून खायचं. नारळ फोडून थोडं भूत आपल्याला लागू नये म्हनून नाराळाचा तुकडा, निवदाचा तुकडा थोडा टाकायचा".[७]

अशा प्रकारे दलित आत्मकथनातून नेहमीच येणारे भूकेचे चित्रण याही आत्मकथनातून आलेले आहे.

६) **सहज निवेदन आणि भाषा.** या दोन्ही लेखकांनी लेखनासाठी वापरलेली भाषा त्यांच्या समाजाचा भाषा आहे. याा समाजाने इतर समाजापासूनचे आपले वेगळे वैशिष्टय राखण्यासाठी आपला भाषिक वेगळेपणा जोपासलेला आहे. त्यातूनच आपल्या भावभावना नित्याचं जीवन व्यवहार ते पार पाडत असतात. आपल्या जातीचे वेगळे वैशिष्टय म्हणून पिढ्यानूपिढ्या ते ही भाषा वापरतात. याप्रमाणेच तो लेखक ज्या प्रदेशात राहतो त्या प्रदेशातील भौगोलिक वातावरणाचा, सांस्कृतिक जीवनाचा परिणाम त्यावर झालेला असतो. त्याबरोबर त्याचे वय, शिक्षण व अनुभवाच्या कक्षा जशा रुंदावतील तशी ही भाषा बदलते आहे. असे आपणाला दिसते. तरी या आत्मकथनातून आपले एक भाषिक वैशिष्टय जपलले आहे. असे आपणाला दिसते. गबाळ या आत्मकथनात भटक्या कुडमुडे जोशी समाजात वाढलेल्या लेखकाची भाषा ही या समाजातील संस्कार घेऊनच साकार झालेली आहे. विशेषत: महाविद्यालयीन शिक्षण घेताना मात्र नागरी संस्कार तिच्यावर झाल्याचे आपल्याला दिसते. ''निम्म्यापेक्षा जास्त अंतर आम्ही प्रवास संपविला होता. रस्त्यावर जत्रा भरल्याप्रमाणे दिसत होतं. आई घोड्याबरोबरच चालत होती. पोरं खाली पडत्याली ही काळजी तिला होती. मी आईला म्हणालो '' आये तू घोड्यावर बस.. तुज पाय दुकायला लागलं असत्याली'' आई म्हणाली ''जवळ आलया.. आपण ऱ्हायचं गाव... तवर मी चालते तुम्ही बसा.'' आई चालतच राहीली खरोखरच मालगाव गाठलं. गावच्या अलिकडं गावंदरीलाच वडील वाटेवर बसले होते. ते आमचीच वाट बघत होते''.[८] याप्रमाणेच उचल्या या आत्मकथनात देखील उचल्या समाजाची भाषा अवतरली आहे. आणि या भाषेतून हे लेखन झाल्यामुळे त्यातील विचाराला एक सौंदर्य प्राप्त झालेले आहे. ''चूल पेटवून समदे लहान थोराशी चिवी होयाचे तेवढ्या रातच्यालाच दाणे चांगले खमंग भाजले की जात्यावर बायांनी कन्या भरडायच्या तवर मी कन्यासाठी चुलीवर भगोन्यात आदन ठेवायच. मग कन्या रटरट शिजायच्या आणि तीन-तीन चार-चार दिवसाची भूक कन्या खाऊन भागवायची''.[९]
अशा प्रकारे आगळीवेगळी भाषा, सहज निवेदन यामुळे लेखकाच्या समाजाची वेदना वाचकाच्या हृदयाची पकड घेते.

७) **रुढी, प्रथा परंपरेचे चित्रण.** कोणत्याही समाजाला एक अस्तित्व असते आपले अस्तित्व टिकवण्यासाठी हा समाज काही नियम, रुढी, प्रथा, परंपरा निर्माण करीत असतो. समाजाच्या सर्व

घटकाना हे नियम बंधनकारक असतात. हे नियम मोडल्यास समाजातून बहिष्कृत केले जाते. रोटी बेटी व्यवहार बंद केला जातो. अर्थात आपल्या समाजाची संघटन अबाधित ठेवण्यासाठी प्रत्येक समाज या मार्गाचा अवलंब करीत असतो. तद्वतच गबाळ आणि उचल्या या दोन्ही भटक्या समाजाच्या रुढी परंपरेचे चित्रण आलेले आहे. या समाजात विवाह, बारसे, इ. आनंदाचे क्षण साजरे केले जातात. व्याभिचार करु नये, दरवर्षी आपल्या गावी होणाऱ्या ग्रामदेवतेच्या यात्रा साजरी करावी, जातीच्या बाहेर जाऊन कुणी विवाह करु नये, असे केल्यास दांडीमांडी कलमानुसार शिक्षेची तरतुद करण्यात आलेली आहे. मर्तिकासारख्या संकट समयी सर्वांनी एकत्र आले पाहिजे, असे कांही अलिखित नियम या समाजात आहेत.

'उचल्या' या आत्मकथनात देखील वेगवेगळ्या रुढी परंपरांचे चित्रण आलेले आहे. हा समाज अज्ञानी, अशिक्षित व्यसनी असल्यामुळे या समाजाचे संघटन अबाधित ठेवण्यासाठी नाते संबंध जपण्यासाठी कांही प्रथा, रुढी, परंपराचे पालन केले जाते. ही मंडळी जेंव्हा चोरी करण्यासाठी बाहेर गावी जातात. तेंव्हा ज्या ब्लेड ने चोरी करावयाची आहे. त्या ब्लेडची हळद - कुंकु वाहून पुजा करतात, कोंबडे कापतात, सामुहीक दर्शन घेतात. एखाद्या स्त्रीचा पाऊल वाकडा पडल्यास तिला शुध्द करुन घेतात. तुळजापूरच्या देवीच्या जत्रेला जातात. गोंधळ घालतात.

याप्रमाणेच वाळीत टाकणे, केस भादरुन डोक्याला शेंदूर लावणे, रोटी बेटी बंद करणे. नाक कापणे, गाढवावरुन धिंड काढणे, पैशाच्या रुपात दंड भरणे, पंचा समोर नाक घासणे, इ. शिक्षा ही केल्या जातात.

भटक्या जमातीतील लेखकांने केलेल्या या लेखनामुळे एक भयाण वास्तव समाजासमोर आहे. त्यांच्या व्यथा वेदना साकार झाल्य आहेत. त्यामुळे सवर्णाच्या वेगवेगळ्या जीवनाच्या मुल्यांची तपासणी करुन ती नव्याने मांडण्याची गरज निर्माण झाली आहे. या लेखनाच्या कलात्मक अंगाचा विचार करताना. त्यांची शिर्षके, लेखनरिती, भाषाशैली व त्यातून व्यक्त होणाऱ्या जीवन जाणीवा या मुद्यांच्या अनुशंघाने त्याचे मुल्यमापन करावे लागते. सामाजीक जाणीवेच्या सौंदर्याबरोबरच आकृतीबंध आणि रचना सौंदर्याचा प्रत्यय आपणाला येतो. कांही अंशी या आत्मकथनाचा बाह्य घाट कादंबरीचा आहे. असे का घडते याची कारणमीमांसा करताना एलिस हॅवलॉक म्हणतात की, 'माणूस भावनांचे आत्म प्रकटीकरण करतो वस्तुनिष्ठीकरण करतो, आदर्शी करण करतो, उदात्तीकरण करतो,तर कधी त्याचे नैसर्गीकरण करतो, आपल्या छळवादी अनुभवाला प्रकट करुन केलेल्या आत्मविश्वासातून आत्मसमाधान लागते, 'फिक्शन' चा अंश येतो.' [१०] याप्रमाणेच ही आत्मकथाच्या बाबतीत घडले आहे. आपल्या अनुभवांना साकार करीत असताना

कल्पना विलासाला वाव नाही तरीही या लेखनाला लालित्य लाभलेले आहे. कारण हे लेखन या लेखकाची अंतरमनाची अनुभूती असल्यामुळे या जातीवंत अनुभवात मूळ आशय सौंदर्य धारण करताना दिसतो. विविध प्रकारच्या लेखनरितीचा वापर आणि आपल्या लेखनासाठी त्यांनी योजलेल्या बोली यामुळे या लेखनाला सहजं सौंदर्य प्राप्त झालेले आहे.

''गबाळ'' मधून आलेली मल्हारीबाबा, नागू अजोबा, मानकाई, सोनाई या व्यक्तीचित्रांचा परिचय आपणाला होतो. ही माणसे गरीब असली तरी, दरिद्री असली त्यांच्या मनात कुठेही कडवटपणा नाही. प्राप्त परिस्थितीत संकटाशी सामना करताना ते कुठेही न घाबरता संकटाशी सामना करतात. अशिक्षित असूनही गांधीवादाच्या विचारांशी त्यांची जवळीक दिसते. म्हणूनच ''गबाळ'' चे परिक्षण करताना प्रा. जयंत बंड यांनी ''गबाळच्या पानोपानी त्याची अपरिपक्कता सातत्याने जाणवत राहते. त्यामुळेच शैली बाळबोध आणि वर्णनात्मक झालेली आहे शिवाय अनेकदा पुनरुक्तीचा दोष जाणवत राहतो. काय सांगायचे, किती सांगायचे आणि कसे सांगायचे याचा गोंधळ उडाल्याने त्याच त्याच गोष्टी वर्णिल्या जातात त्यामुळे ''गबाळ'' मध्ये पुनरुक्ती व विस्कळीतपणा आलेला आहे.[११] असे मत मांडलेले आहे. अर्थात बंड यांनीच परीक्षणात ''एका भटक्या जमातीचे वेधक चित्रण'' असे शीर्षक दिलेले आहे. त्यामुळे बंड यांच्या मनातील गोंधळ स्पष्ट होतो. या प्रा. वासुदेव मुलाटे यांच्या उपरोक्त विधानाची यथार्थता ''गबाळ'' वाचताना जाणवते.

''उचल्या'' मध्येही मार्तंडबाबा श्री. भगवानराव देशपांडे, सौ. छबू यांची व्यक्तीचित्रे अत्यंत समर्पकरित्या रेखाटलेले आहेत आणि भटक्या जातीजमातीच्या व्यथा वेदना यथार्थरित्या साकार झालेल्या आहेत.

# संदर्भ टीपा


१) दलित साहित्य वेदना आणि विद्रोह - भालचंद्र फडके, श्री विद्या प्रकाशन.

२५०, शनिवार पेठ, पुणे. प्र.आ. १९७७, पृ. २१५.

२) बांधिलकी आणि साहित्य - यशवंत मनोहर, सिल्विहया प्रकाशन, नागपूर.

प्र. आ. १९८३, पृ. १७.

३) ''गबाळ'' दादासाहेब मोरे - श्री विद्या प्रकाशन,

२५०, शनिवार पेठ, पुणे, प्र. आ. १९८३, पृ. २०१

४) ''उचल्या'' मनोगत - लक्ष्मण गायकवाड - श्री विद्या प्रकाशन,

२५०, शनिवार पेठ, पुणे, प्र. आ. १९८७, पृ. १८८.

५) उ.नि. पृष्ठ ३७.

६) उ.नि. पृष्ठ ३२.

७) उ.नि. पृष्ठ ३२.

८) उ.नि. पृष्ठ २६.

९) उ.नि. पृष्ठ ३३.

१०) दलित आत्मकथेच्या निमित्ताने - स. दा. कऱ्हाडे, अस्मितादर्श, पृष्ठ १२५.

११) ''गबाळ'' एका भटक्या जमातीचे वेधक चित्रण - जयंतकुमार बंड,

तरुण भारत, रविवार, दि. २९-७-८४, पृ. ५.